# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/07/2023 (शनिवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील वारेगाव शिवार येथे दिनांक १३/०७/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक १४/०७/२०२३ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आशिष कैलास सिंगल, वय ३२ वर्ष, रा. महालक्ष्मी सिटी बोकारा कोराडी याच्या वारेगाव शिवार येथील स्टोन इन्फ्रा कंपनीमधील खुल्या जागेवरून १) ७० नग ॲल्युमिनियम पाईप प्रत्येकी १२ फिट लांब किंमती अंदाजे २,५०,०००/– रुपये २) ४० नग लोखंडी सेंटिंग प्लेट किंमती अंदाजे ७५,०००/– रुपये ३) १५ नग मॅटर स्ट्रीप किंमती अंदाजे २५,०००/–रुपये असा एकूण ३,५०,०००/– रुपयाचा मुद्‌देमाल कोणीतरी अज्ञान चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार ब. नं. ११९ पोस्टे खापरखेडा मो. नं. ८०८००८८५२८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा रानवाडी शिवार येथे दिनांक ०७/०६/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक १४/०७/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अर्जुन दशरथ खरपुरीया, वय ५५ वर्ष, रा. रानवाडी हे गट ग्रामपंचायत सदस्य या पदावर असुन ग्रामपंचायत येथील सार्वजनिक विहीरी वरून गावांना पाणी पुरवठा केला जात होता. सदर विहीरीवरून २०० फुट केबल किंमती अंदाजे ५०००/–रु. चोरून नेला आहे. तसेच रानवाडी शिवारात सुध्दा तलावाचे शेताचे आजुबाजुला असणारे १५ शेतकरी यांचा अंदाजे ७०० फुट केबल किंमती अंदाजे १७५००/–रू. असा एकुण ९०० फुट केबल वायर किंमती अंदाजे २२५००/–रुपयाचा मुद्‌देमाल अज्ञात चोरांनी चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक फिरोज शेख ब. नं. ४५६ पोस्टे जलालखेडा मो. नं. ७७२२०३६४५६ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत मौजा सालई गोधनी ते पाचगाव रोड येथे दिनांक १२/०७/२०२३ चे रात्री ००.०१ वा. ते दिनांक १२/०७/२०२३ चे सकाळी ०९.०० वा. दरम्यान मौजा सालई गोधनी ते पाचगाव रोड वरून प्रदिप स्टोन क्रशर जवळील ६३ केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफार्मर डी. टी. सी. कोड ४३६७ २८८ विदयुत ट्रान्सफार्मर जमिनीवर पडुन विदयुत टान्सफार्मर डीपी स्टॅक्टर ए. बी स्वीच, डीस्ट्रीब्युशन बॉक्स एल. टी केबल तसेच ट्रान्सफार्मरमधील ऑईल असे महावितरण कंपनीचे शासकिय मालमत्ता १,६०,०००/—रू. चे कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द ३७९ भा.द.वि सहकलम १३९ भा.वि.का. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरिहर सोनकुसरे पो.स्टे कुही मो. नं. ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**